स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 27–04–2018** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 9. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 10. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 11. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 12. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 13. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 14. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 15. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 72**:— **{बाजार विभाग}** कार्यकारी संचालक (नियोजन व जमीन) नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांनी मौजा नागपूर येथील भुमापन क्र. 365 नगर भुमापन क्र. 103 शिट क्र. 228 मधील 31505.37 चौ.मी. पैकी (नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची) 489 चौ.मी. जमीन व मौजा सिताबर्डी भुमापन क्र. 350 नगर भुमापन क्र. 2360 शिट क्र. 49 एकुण आराजी 2070.6 चौ.मी. पैकी 724.42 चौ.मी. जागेवरील म.न.पा.च्या बाधित होणाऱ्या परवानाधारकांच्या पुनर्वसनाकरीता हिंदी भाषी संघ समोरील जागेवर प्रस्तावित केलेल्या बांधकामाच्या आराखडयास परवानगी मिळण्याबाबत पत्र क्र. एन.एम.आर.पी./एन.एम.सी. लॅन्ड/क्यु/2018 दि. 8/03/2018 सादर केले आहे.

महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांनी मागणी केलेल्या जागेमध्ये धंतोली झोन क्र. 4 मधील 5 दुकानांचा आणि गांधीबाग झोन क्र. 6 मधील 23 दुकानांचा समावेश असुन यामध्ये मेट्रो रेल कार्पोरेशन व्दारे खोवा व पान मार्केट मधील अधिग्रहीत केलेल्या जागेवरील रेल्वे फिडर रोड वरील 5 दुकानांचा पुनर्वसन करणाऱ्यांच्या यादीमध्ये समावेश करण्यात आलेला नव्हता त्यामुळे त्या परवानाधारकांची नावे देखील यामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. झोन निहाय बाधित परवानाधारकांची संख्या खालील प्रमाणे आहे.

1) <u>गांधीबाग झोन क्र. 6</u> संत्रा मार्केट जुनी केला लाईन येथील 5 दुकाने व संत्रा मार्केट रेल्वे फिडर रोड वरील पटेल व्दार जवळील तीन – रो मधील प्रत्येकी पहिली 6 दुकाने असे 18 दुकाने असे एकुण 23 दुकाने

2) <u>धंतोली झोन क्र. 4</u>फुले मार्केट समोरील रेल्वे फिडर रोड, सुभाष रोड, भापकर पार्क येथील 5 दुकाने

दोन्हीझोन मिळुन एकुण 28 दुकाने बाधित होत आहेत. बाधित होत असलेल्या 28 परवानाधारकांची यादी नस्तीत जोडलेली आहे.

मेट्रो रेल्वे कार्पोरेशन यांनी उक्त जागेवरील बाधित होणारे म.न.पा.चे परवानाधारक यांचे पुनर्वसन हिंदी भाषी संघ शाळेच्या समोरील पटांगणावर अर्ध्या भागात करण्याचे प्रस्तावित केले असुन, यामध्ये 31 दुकानांचे बांधकाम प्रस्तावित आहे. सोबत पुनर्वसनाचा नकाशा जोडला आहे.

मेट्रो रेल्वे कार्पोरेशन यांनी म.न.पा.च्या मौजा नागपूर येथील भुमापन क्र. 365 नगर भुमापन क्र. 103 शिट क्र. 228 मधील 31505.37 चौ.मी. पैकी (नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची) 489 चौ.मी. जागा व मौजा सिताबर्डी भुमापन क्र. 350 नगर भुमापन क्र. 2360 शिट क्र. 49 एकुण आराजी 2070.6 चौ.मी. पैकी 724.42 चौ.मी. जागेवरील बाधित परवानाधारकांच्या पुनर्वसनाकरीता सादर केलेल्या दुकानाच्या बांधकामाच्या प्रस्तावित आराखड्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास बहुमताने मंजूरी प्रदान केली. (मा. सदस्या हर्षला साबळे यांनी विषयास विरोध नोंदविला)

<u>ठराव क्रमांक 73ः–</u> नागपूर वाहतुक पोलीस व नागपूर महानगरपालिका यांचे {वाहतूक विभाग} संयुक्तरित्या वाहतुकीच्या कोंडीचे निवारन करण्याकरिता नागपूर शहरामधे अनाधिकृत पार्किंग करणाऱ्या वाहनांना उचलण्याकरिता संरचना, बांधा, वापरा व देखभाल करा (DBOM) या धर्तीवर टोवींग व्हॅनची पध्दती खालील अटी व शर्ती अमलात आणण्याचा व त्यानुसार निवीदा बोलविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

अटी व शर्ती :–

१) कमीत कमी वेळेकरीता जी यंत्रणा/ निवीदाकार टोवींग मशीन सिस्टीम उपलब्ध करेल त्या निविदाकारास पात्र निविदाकार ठरविण्यात येईल.

२) टोवींग शुल्क चार चाकी वाहनाकरिता प्रत्येकी रू. ४००/– व दोन चाकी वाहनाकरीता प्रत्येकी रू २००/– (GST वगळून) वसूल करणे.

३) प्रत्येक वर्षाकरीता टोवींग शुल्कामध्ये ५% वाढ करणे.

४) महानगरपालिकेच्या रस्त्यावर / जागेवर अनधिकृत पार्किंग करण्यात आलेल्या वाहनांवरील लावण्यात आलेल्या दंडाच्या वसूलीतून १०% रक्कम ही नागपूर महानगरपालिकेस देय राहील

५) पात्र कंत्राटदार हे Digital Payment व्दारेच दंड वसूल करतील.

६) नागपूर वाहतुक पोलीस दंड वसूली केंद्र उभारतील व यशस्वी एजन्सी दररोज ही वसूली भरतील व वसूलीतून टोवींग चार्जेस एजंन्सीला देण्यात येईल.

७) उचलण्यात येणारी वाहने पार्क करण्याकरीता वाहनतळे नागपूर शहर पोलीस व नागपूर महानगरपालिका यांचे मार्फत ठरवून ती वाहनतळे कंत्राटदारास देण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 243 (अ) मध्ये वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे व त्या संबधातील फी किंवा शुल्क यासाठी करण्याची या कलमा अंतर्गत तरतुद आहे. त्यामुळे प्रस्तावित विषयाच्या अनुषंगाने वाहनतळे उपलब्ध करून द्यावी किंवा निर्माण करावी व त्याचे शुल्क निश्चित करावे, प्रस्तावित विषयात विभागाने जो प्रस्ताव सादर केला आहे त्या टोवींग व्हॅनची पध्दतीचे संचालन व कंत्राट हे पोलीस आयुक्त, नागपूर यांचे विभागाद्वारे करावे असे कळवावे या सुचनेस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 74ः—** **{विद्युत विभाग}** नागपूर महानगरपालिकेच्या इमारतींमधील पारंपारिक टयुब लाईटस् बदलविण्याकरीता 16 वॅट (+/—5%) एल.ई.डी. फिटिंग्सचा पुरवठा करण्याकरीता प्राकलनीय राशीपेक्षा 1% ने कमी असलेली रू. 45,56,376/— ची निम्नतम दराची मे. राहूल कन्स्ट्रक्शन्स, नागपूर यांच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 75ः—** **{समाजकल्याण विभाग}** समाज कल्याण विभागामार्फत महिला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातुन नागपूर महानगरपालिकेतील १५६ वार्डातील प्रत्येकी २ लाभार्थी प्रमाणे गरीब, गरजु, विधवा व परितक्ता महिलांना स्वयंरोजगार मिळावा या दृष्टीने काचबटन व पिको—फॉल मशीन महिला व बाल कल्याण समितीचे ठरविलेल्या निकषाच्या आधारे लाभार्थ्यांना खरेदी करावयाचे आहे. लाभार्थी निश्चितीकरिता सहा. आयुक्त, झोन क्र. १ ते १० यांच्या मार्फत लाभार्थ्यांचे प्रस्ताव मागवुन महिला व बाल कल्याण समितीव्दारे लाभार्थ्यांची निवड करून पात्र लाभार्थ्यांनी मशीन खरेदी केल्यानंतर अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या बॅक खात्यात जमा करण्याची कार्यवाही बाबतचा प्रस्तावास मंजुरी देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 76ः—** **{अग्निशमन विभाग}** GeM Portal वर उपलब्ध असलेले 1777 EN norm प्रमाणे 32 मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म खरेदी करणेबाबत अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाकरीता 32 मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म ई—निविदा मागवून खरेदी करण्याचे स्थायी समिति ठराव क्र. 854 दि. 26.12.2016 प्रमाणे मंजूर झाले होते.

त्याअनुषंगाने विभागाने सदर मशीन खरेदी कार्याचे ई—निविदा मागविली होती. या दरम्यान भारतीय बनावटीचे 32 मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म DGS & D-QA शासकीय दरकरारानुसार उपलब्ध होते. काही काळातच DGS & D-QA शासनातर्फे निरस्त होवून त्याऐवजी GeM Portal वर साहित्य खरेदी करण्याचे शासनातर्फे धोरण निश्चित करण्यात आले. त्यामुळे खरेदी कार्याची ई—निविदा प्रक्रिया रद्द करून GeM Portal द्वारे सदर मशीन खरेदी करण्याचे विभागातर्फे निश्चित करण्यात आले.

सध्या शासकीय GeM Portal वर M/s. Liftmak Udyog Pvt. Ltd., Hariyana यांचे भारतीय बनावटीचे व M/s. Brijbasi Fire Safety Systems Pvt. Ltd., Mumbai यांचे EN 1777 या आंतर्राष्ट्री मानकाचे 32 मी. हॅड्रोलिक प्लेटफॉर्मचे दर उपलब्ध आहेत.

GeM Portal वर उपलब्ध असलेले दोन्ही फर्मचे तांत्रिक स्पेशिफिकेशन खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Technical Specification onGem Portal of 32 Mtr. Hydraulic Platform | BRONTO SKYLIFT - BRIJBASI | Remark | LIFTMAK | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Wheel Base** | 4200 mm | Advantage | 6100 mm | Disadvantage |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | **The Hydraulic Platform Shall Comply With The Safety Requirements And Features As Enumerated Below In Detail, Which Are Compiled From EN1777 Standards And Ministry Of Commerce, Govt. Of India** | Yes, **EN1777 Certificate enclosed** | Advantage | **No EN 1777 certificate** | Disadvantage |
| 3 | **Number Of Booms** | 2 | Advantage | 3 | Disadvantage |
| 4 | **Number Of Telescopic Sections** | 2 | Advantage | 3 | Disadvantage |
| 5 | **Welding Process** | ISO3834-2 certified, plasma welding | Advantage | MIG WELDING | Disadvantage |
| 6 | **Maximum Cage Floor Height From Ground Level (Meters)** | 30 meters | Disadvantage | 30.5 meters | Advantage |
| 7 | **Cage Dimensions Outer +/- 5% Approx. 1045 X 2050 X 1150 (LxWxH) (mm)** | 1100 x 2100 x 1100 mm mm3 | Advantage | 1045 X 2050 X 1150 mm3 | Disadvantage |
| 8 | **Maximum Reach (from Slew Centre) To Cage Corner Plus 0.5m At Full Rated Load (m)** | 18 meters | Advantage | 21.0 meters | Disadvantage |
| 9 | **Overall Stowed Dimensions Shall Not Exceed 12.0m X 2.5m X 4.0m (LxWxH)** | 10x2.5x3.9 m m3 | Advantage | 11.0m x 2.5m x 4.0m m3 | Disadvantage |
| 10 | **Maximum Outrigger Width For Front With Both Jacks Extended (as Per Design)** | 5500 mm | Advantage | 7500 mm | Disadvantage |
| 11 | **Static Stability Of Built Up Unit On Chassis To Incline Of (degrees)** | 22 Degree | Advantage | 17 Degree | Disadvantage |
| 12 | **Overall Width ( With Outriggers)** | 5.5 meters | Advantage | 7.3 meters | Disadvantage |
| 13 | **Overall Length ( Incl. Overhung )** | 10 meters | Advantage | 11.0 meters | Disadvantage |
| 14 | **Overall Height** | 3.9 meters | Advantage | 3.95 meters | Disadvantage |
| 15 | **Turning Circle (Kerb To Kerb )** | 10 meters | Advantage | 11.4 meters | Disadvantage |
| 16 | **Turning Circle ( Swept Circle )** | 9 meters | Advantage | 10.4 meters | Disadvantage |
| 17 | **Max Gross Weight** | 25 tonne | Advantage | 31 tonne | Disadvantage |
| 18 | **Warranty Time** | 24 months | Advantage | 12 months | Disadvantage |
| 19 | **Transportation Charge In Rupees Per Km** | 15 Rs per km | Advantage | 18 Rs per km | Disadvantage |
| 20 | **Price INR** | Rs. 51300000 | - | Rs. 31616000 | - |

M/s. Brijbasi Fire Safety Systems Pvt. Ltd., Mumbai (Bronto Skylift, Finland) व M/s. Liftmak Udyog Pvt. Ltd., Hariyana 32 मी. हॅड्रॉलिक प्लेटफॉर्मचे निर्माते यांचे तांत्रिक स्पेशिफिकेशनची तुलना केली असता

1. 32 मी. हॅड्रालिक प्लेटफॉर्मचा वापर उंचे ठिकाणी घडलेल्या अग्नि व इतर आपत्तीच्या दुर्घटनांवर केला जातो. अशा उंचीच्या दुर्घटनांवर कर्मचाऱ्यांतर्फे अग्निशामक/विमोचक कार्य अधिक जोखिम स्वरूपाचे असते.
2. शहरातील नविन व जुन्या वस्त्यांमधील अरूंद रस्ते या ठिकाणी उभे असलेली वाहने त्यामुळे अग्निशमन वाहनास जाण्याकरीता होणारा अडथळा अस्तित्वात असलेल्या इमारती भोवताल उपलब्ध नसलेले सामासिक अंतर (side marginal open space) याचा विचार करता अशा ठिकाणी कार्य करण्यास आकाराने छोटी व कमी जागेत वळण्याची क्षमता असलेले वाहन जास्त उपयोगी ठरते.

अशावेळेस वाहनाचे वजन, लांबी, रूंदी आधुनिक तंत्रज्ञान, टिकावूपणा, इतर सुविधा व वाहनाचे आंतरराष्ट्रीय सुरक्षा मानक या बाबींचा वाहन खरेदी करते वेळेस विचारात घेणे गरजेचे असते.

3. M/s. Liftmak Udyog Pvt. Ltd., Hariyana यांचे GeM Portal वर दर कमी असले तरीही त्यांची 32 मी. हॅड्रोलिक प्लेटफॉर्म मशीन EN 1777 या आंतर्राष्ट्रीय मानकाप्रमाणे नाही. त्यामुळे त्यांचेकडून खरेदी करण्याचा विचार करणे योग्य होणार नाही.

करीता GeM Portal उपलब्ध असलेले 1777 EN Norm प्रमाणे M/s. Brijbasi Fire Safety Systems Pvt. Ltd., Mumbai (Bronto Skylift, Finland) यांचेकडून 32 मी हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म खरेदी करून घेण्यास यावर येणारा अपेक्षित खर्च रू. 5,13,00,000 प्रमाणे GeM Portal वर नमुद आहे. GeM Portal वर Bidding करतेवेळेस निरीक्षण कार्य, कर, असेसरीज, अतिरीक्त साहित्य, व वाटाघाटी इ. कार्यास राशीमध्ये वाढ किंवा घट याप्रमाणे सदर मशीन खरेदी करून घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित खरेदी ही रू. 1.00 कोटी पेक्षा जास्त आहे. दिनांक 24 ऑगस्ट 2017 च्या शासन निर्णयातील मुद्या क्र. 8 मध्ये मोटार वाहन खरेदी बाबतची स्पष्टता लक्षात घेता प्रस्तावित विषयाची खरेदी ही ई–निविदा प्रक्रियेमार्फत करावी या सुचनेस एकमताने मंजूरी तसेच विभागाने सादर केलेला प्रस्तावास समितीने नामंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 77</u>:–** प्रभाग क्र. 33 अ मधील भगवान नगर परिसरात रोडचे **{लोककर्म झोन 04}** सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 10 निविदापैकी निम्नतम निविदाकार में. एम. डि. कंन्सट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 16.13 टक्के कमी दराची निविदा रूपये 41,19,510/–( रूपये ऐक्केचाळीस लक्ष ऐकोणविस हजार पाचशे दहा रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्रमांक (680) A42001374612 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सन 2018–19 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पास म.न.पा. सभागृहाची अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यावर उपरोक्त प्रस्ताव स्थायी समिती समोर प्रावधान नोंदवून प्रस्तावित विषय परत सादर करावा या सुचनेस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 78</u>:–** नागपूर शहरातील, पावसाळयापुर्वी नाले सफाई **{कारखाना विभाग}** करण्याकरीता, झोननिहाय मुख्य रस्ते, हमरस्ते, रस्त्यालगत साठून राहीलेला बांधकाम साहित्य/कचरा/निरुपयोगी साहित्य यांची विल्हेवाट लावण्याकरीता तसेच स्वच्छ सर्वेक्षण अभियान करीता, मनपाचे उपलब्ध वाहने/मशिनरी अपुरी पडल्यास, झोनस्तरावर/आरोग्य विभाग/ईतर विभागीय स्तरावर वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याकरीता व्दिवार्षिक दरकरार करण्याचे नियोजन आहे.

वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याकरीता ई–निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. ई–निविदे मध्ये प्राप्त निम्मतम दर व मशिन प्रकार खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मशिन प्रकार | निम्मनतम दर (रु) | निविदाकाराचे नाव |
|---|---|---|---|
| 01 | 04 टन क्षमतेचे ऐस्कॉव्हेटर | 1449/ तास | मे. मनवर कन्स्ट्रक्शन |
| 02 | 07 टन क्षमतेचे ऐस्कॉव्हेटर | 1449/ तास | मे. मनवर कन्स्ट्रक्शन |
| 03 | 10 टन क्षमतेचे ऐस्कॉव्हेटर | 1600/ तास | मे. अवस्थी ट्रेडर्स |
| 04 | 20 टन क्षमतेचे ऐस्कॉव्हेटर | 2549/ तास | मे. मनवर कन्स्ट्रक्शन |
| 05 | 76 HP क्षमतेचे जेसिबी | 750/ तास | मे. अवस्थी ट्रेडर्स |
| 06 | 09 टन क्षमतेचे टिप्पर | 40/कि.मी | मे. अवस्थी ट्रेडर्स |

| | | | |
|---|---|---|---|
| 07 | 12 टन क्षमतेचे क्रेन | 1749/ तास | मे. मनवर कन्स्ट्रक्शन |
| 08 | 12 टन क्षमतेचे ट्रेलर | 3399/ तास | मे. मनवर कन्स्ट्रक्शन |
| 09 | 20 टन क्षमतेचे डोझर | 1,05,000/ महिना | मे. अवस्थी ट्रेडर्स |

वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याकरीता पुढील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

1) तक्ता ''अ'' अंतर्गत अनु क्र. 09 अंतर्गत डोझर भाडेतत्वावर पुरविण्याच्या दरासंबंधी मे. अवस्थी ट्रेडर्स व मे. बि.पी. उके यांनी कार्यालयात पत्र दिले आहे. की डोझर मासीक भाडेतत्वावर पुरविण्याचे त्यांनी भरलेले दर हे अवधानाने चुकीचे भरल्यामुळे ते रद्द करावे. तसेच प्राकलणीय दर रु. 12,00,000/- असुन दोघान्ही अनु क्र. रु. 1,05,000/- व रु. 1,10,000/- डोझर मासीक भाडेतत्वावर पुरविण्याचे दर दिले आहे. यात खुप तफावत आहे. तरी नमुद दर रद्द करुन तृतीय कमी दर असणारे निविदाकार मे. मनवर कन्स्ट्रक्शन, यांचे दर रु. 10,19,999/- हा दर डोझर मासीक भाडेतत्वावर घेण्याच्या दरास मान्यता प्रदान करावी.

2) मनपा मालकीची वाहने/मशिनरी अपुरी पडल्यास, वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याकरीता, झोननिहाय/आरोग्य विभाग/ईतर विभाग यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, मागणीनुसार झोनस्तरावर/विभागनिहाय/आरोग्य विभागतर्फे वाहने/मशिनरी व्दिवार्षीक दरकरारातील दरावर भाडेतत्वावर घेण्याकरीता मान्यता प्रदान करावी.

3) झोनस्तरावर मा. सहा. आयुक्त व झोनल अधिकारी (स्व.) याच्यातर्फे मागणी झालेली वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याकरीता व्दिवार्षीक दरकरारात निम्नतमदर असणारे निविदाकार यांना प्राधान्य व त्यांच निम्नतम दरावर उर्वरित निविदाकार यांच्यातर्फे वेळेवर मागणीकेलेली वाहने/मशिनरी उपलब्ध होत नसल्याचे र्निदेशनात आल्यास, दरकरारातील दरावर किंवा त्यापेक्षा कमी दरावर खुल्या बाजारातुन झोनस्तरावर वाहने/मशिनरी उपलब्ध करण्याची मान्यता प्रदान करावी.

4) ई—निविदे अंतर्गत प्राप्त निम्नतम दर हे दोनवर्षाच्या कालावधी करीता निश्चीत करण्यात येणार असल्यामुळे दोन वर्षाच्या कालावधीत दरामध्ये चढ-उतार होऊन बाजारातील दर व ई—निविदा अंतर्गत प्राप्त निम्नतम दर यामध्ये तफावत येऊ शकते. तथापी, मंजूर दर हे पुढील दोन वर्षाचे कालावधीसाठी पुरवठादारास बंधनकारक राहील.

5) झोन निहाय नाले सफाई, झोननिहाय मुख्य रस्ते, हमरस्त्यावरील टाकाऊ साहित्य/मटेरियल्स साफ सफाई करण्याच्या अनुषंगाने सहा. आयुक्त व झोनल अधिकारी यांनी व्दिवार्षीक दरकरारात नमुद दरावर अथवा नमुद दरापेक्षा कमी दराप्रमाणे आपल्या क्षेत्रीयस्तरावर खुल्या बाजारातून आवश्यतेनुसार वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याची मान्यता प्रदान करावी.

6) उक्त कार्याकरीता भाडेतत्वावर घेण्यात येणा-या मशिनरीचे देयके नियमाप्रमाणे रितसर कार्यवाही अन्वये, आरोग्य विभागातील पद क्र. A43401171602 अतंर्गत किंवा त्या-त्या झोनच्या सबंधित पदाअतंर्गत आरोग्य विभाग किंवा झोनतर्फे काढण्याची मान्यता प्रदान करावी.

करीता वरील 01 ते 06 वरील प्रस्ताव व तक्त्याअतंर्गत अ.क्र. 1 ते 8 वरील वाहने/मशिनरीचे निम्मतम दर हे व्दिवार्षीक दर म्हणुन निश्चित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 79</u>:— प्रभाग क्र. १९ ड नमकगंज येथील साईबाबा बेकरी {**लोककर्म झोन 06**} पासून निशा कलेक्शन दाजीशाळा पर्यंत नाल्याचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू.३६,६१,१५१/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A28801332203 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सन 2018—19 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पास म.न.पा. सभागृहाची अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यावर प्रावधान नोंदवून निविदा काढण्यात याव्या या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 80</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर